# महाराष्ट्र राज्याचे वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ अंतंगत वीजदर सवलत मिळणाऱ्या यंत्रमाग घटकांची आयुक्तालयाचे संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करण्यासाठी अंतिम मुदत दिनांक ३१ मे,२०२१

शासन निर्णय दिनांक २१ डिसेंबर २०१८ अन्वये राज्याचे वस्त्रोद्योग धोरण २०१८-२३ अंतर्गत वस्त्रोद्योग घटकांना वीजदर सवलत लागू करण्यात आली आहे. वीजदर सवलतीस पात्र असणाऱ्या यंत्रमाग घटकांना आयुक्तालयाच्या https://www.dirtexmah.gov.in वेबसाईटवर ऑनलाईन नोंदणी करण्याची अंतिम मुदत दिनांक २८ फेब्रुवारी २०२१ पर्यंत देण्यात आली होती. याबाबत या उद्योगाच्या संघटना तसेच लोकप्रतिधी यांनी दिलेल्या निवेदनांच्या अनुषंगाने या कालावधीत वाढ करण्यात येत असुन, नोंदणी करण्याची अंतिम मुदत दिनांक ३१ मे,२०२१ पर्यंत देण्यात येत आहे. या मुदतीत जर सबंधित यंत्रमागांनी अर्ज केला नाही तर त्यांची वीज सवलत जो पर्यंत ते यंत्रमाग घटक नोंदणी करीत नाहीत तो पर्यंत बंद करण्यात येईल.

शासन निर्णय दिनांक २५ फेब्रुवारी, २०२१ अन्वये २७ अश्वशक्ती पेक्षा कमी जोडभार असलेल्या यंत्रमाग धारकांना नोंदणी अर्ज ऑनलाईन किंवा ऑफलाइन यापैकी कोणत्याही प्रकाराने नोंदणी अर्ज सादर करण्याची मुभा देण्यात आली आहे. २७ अश्वशक्ती पेक्षा कमी जोडभार असलेल्या यंत्रमाग धारक ऑफलाईनव्दारे सादर करावयाचा अर्ज वस्त्रोद्योग आयुक्तालयाच्या वेबसाईटवरून डाऊनलोड करून, आयुक्त, वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य, सिव्हील लाईन्स,नागपूर येथे सादर करू शकतात असे शीतल तेली- उगले,भा.प्र.से. आयुक्त,वस्त्रोद्योग, महाराष्ट्र राज्य,नागपूर यांनी कळविले आहे.

--